वनसेवा परीक्षा

ANS

101155

# 2008

# MARATHI (Compulsory)

# मराठी ( अनिवार्य )

**कालावधी : 3 तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :**

(i) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

(iii) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने फक्त अपेक्षित प्रश्नसंख्ये इतक्या प्रश्नांची उत्तरे तपासली जातील व उर्वरित प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.

(iv) तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.

(v) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने आपला आसन क्रमांक, प्रश्नांत दिलेल्या व्यतिरिक्त स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे कोणतेही चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(vi) सर्व प्रश्नांची उत्तर फक्त मराठीमध्येच द्यावीत.

---

**1. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 500 शब्दांचा निबंध लिहा.** **15**

(a) प्रदूषण – एक समस्या

(b) मी पाहिलेला क्रिकेट सामना

(c) जीवनातील हास्य हरवले तर

(d) मी मतपेटी बोलतेय

(e) एड्‌सच्या विळख्यात मानव

2. (अ) (i) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दांत अर्ज लिहा. 5

वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे तुमच्या गावात येणारा रस्ता नादुरूस्त झाला आहे. तरी तो दुरूस्त करण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम अधिकाऱ्यास विनंती अर्ज करा.

(अजय ठोंबरे विनंती अर्ज लिहित आहे. बांधकाम अधिकारी, पुणे 28 यांना)

**किंवा**

(ii) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दांत तक्रार पत्र लिहा.

रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या व्यत्ययाबद्दल पोलीस खात्याकडे एक तक्रार नोंदवा (गणेश देशमुख तक्रार करीत आहेत मा. पोलीस सब इन्स्पेक्टर, डेक्कन जिमखाना, पुणे, 4 यांना)

P.T.O.

(ब) (i) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दांत कार्यक्रमाचा अहवाल लिहा : 5
तुमच्या गावात घेतल्या गेलेल्या साक्षरता दिंडी कार्यक्रमाचा अहवाल तयार करा.

**किंवा**

(ii) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दांत वृत्तांतलेखन करा.
क्रीडा मंडळातर्फे घेण्यात आलेल्या युवा क्रीडा सप्ताह कार्यक्रमाचा वृत्तांत तयार करा.

(क) (i) दिलेल्या माहितीच्या आधारे मुलाखतीच्या वेळी झालेला संवाद सुमारे शंभर शब्दांत लिहा : 5
रेल्वे स्टेशनवरील हमालाची मुलाखत शंभर शब्दांत लिहा.

**किंवा**

(ii) दिलेल्या माहितीच्या आधारे पत्रकारपरिषदेचा वृत्तांत प्रश्नोत्तर स्वरूपात शंभर शब्दांत लिहा.
गावातील विकास कामाच्या उद्‌घाटनाची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली. यांचा वृत्तांत शंभर शब्दांत लिहा.

3. (अ) विद्यापीठ युवक महोत्सवाची निमंत्रणपत्रिका तयार करा. 5

**किंवा**

तुमच्या शहरातील नवीन पुलाचे उद्‌घाटन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते होणार आहे. त्याची कार्यक्रमपत्रिका तयार करा.

(ब) तुमच्या मित्राच्या स्पर्धा परिक्षेच्या मुलाखतीसाठी त्याला पन्नास शब्दांचे शुभेच्छापत्र तयार करा. 5
(श्रीकांत पाठक अंमळनेर येथून अभिषेक साठेला पत्र पाठवित आहे).

**किंवा**

तुमच्या एका मित्राला राज्य क्रीडा पुरस्कार मिळाला आहे. त्याचे पत्राने अभिनंदन करा.
(विश्वास कदम, अमरावती याला सतीश सोळुंके, मुंबई - 02 येथून पत्र लिहित आहे.)

(क) तुमच्या गावात होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या माहितीचे आवाहन प्रसार माध्यमांना शंभर शब्दांच्या मजकुराने करा. 5

**किंवा**

गावातील पाणी प्रश्नासाठी होणाऱ्या रास्ता रोकोचे निवेदन प्रसार माध्यमांना सुमारे शंभर शब्दांत लिहा.

4. **(अ) खालील दोहोंपैकी एका विषयावर औपचारिक भाषणाचा मजकूर सुमारे शंभर शब्दांत लिहा.** 5
(i) बलशाली भारताची बलशाली स्त्री
(ii) भृणहत्या–सामाजिक कलंक

**(ब) खालील दोहोंपैकी एका विषयावर माहितीच्या आधारे दोन व्यक्तींतील संवाद सुमारे शंभर शब्दांत लिहा.** 5
(i) माहिति अधिकारी व कर्मचारी
(ii) दुकानदार – ग्राहक

7. **(अ) खालील शब्दांच्या जाती ओळखा.** 3

(1) धर्म (2) सौंदर्य (3) महात्मा (4) आहे (5) खातो (6) फळं

**(ब) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात रूपांतर करा. (कोणतीही सहा)** 6

(1) त्यांच्या थट्टेचा मला मुळीच राग येत नाही. (मिश्र वाक्य)

(2) नवीन शोधांमुळे या हक्कांवरच आक्रमण होते व ते अजून चालू आहे. (केवल वाक्य)

(3) परवानगीशिवाय आत येवू नये (संयुक्त वाक्य)

(4) खोली स्वच्छ झाडायला शिपायाला सांगा. (मिश्र वाक्य)

(5) आपण काय करीत आहोत हे कोणाला तरी समजावे यासाठी माझे मन तोपर्यंत तृषार्त होते. (संयुक्त वाक्य)

(6) आता या गोष्टींचा मला एक मनस्वी कंटाळा आीण चीडही येऊ लागली आहे. (मिश्र वाक्य)

(7) तो नुकताच मिसरुड फुटलेला पोरगा, ती समाधी नसल्याचे सांगत राहूनही त्याचे कोणी ऐकले नाही. (संयुक्त वाक्य)

**(क) खालील वाक्यांचे काळ ओळखा.** 3

(1) अक्षया नृत्य करते.

(2) तू स्वत:चे काम करशील तर मी तुला मदत करीन.

(3) तानाजी शौर्याने लढला.

(4) समर्थ रामदास म्हणतात, 'जगी सर्वसुखी असा कोण आहे?'

(5) सगळेच मूर्ख कसे असतील?

(6) मधु नियमित वर्तमानपत्र वाचत असतो.

8. **(अ) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे रूपांतर करा. (कोणतेही सहा)** 3

(1) तुम्ही सांगितले तसे मी ऐकले. (भविष्यकाळ)

(2) विराज अभ्यास करणार आहे. (वर्तमानकाळ)

(3) सचिन क्रिकेटची मॅच खेळणार आहे. (भूतकाळ)

(4) मुख्यमंत्र्यांचा उद्या आपल्या गावात दौरा आहे. (वर्तमानकाळ)

(5) सा रे ग म चा कार्यक्रम दूरदर्शनवर गुरुवारी झाला. (भविष्यकाळ)

(6) मी निबंध लिहितो. (भूतकाळ)

(7) तो मुलगा खूप हुशार होता. (वर्तमानकाळ)

(8) संपदा उत्कृष्ट खो-खो पट्टू होती. (भूतकाळ)

(9) श्रीकांतने जेवण केले आहे. (भूतकाळ)

6. **(अ) खाली दिलेला उतारा वाचून 1/3 शब्दांत सारांश लेखन करा.** 5

दु:खे येतात ती आपली कसोटी पाहण्यासाठीच येतात. त्यावेळी न डगमगणे हाच खरा पुरुषार्थ. भट्टीतून तावून सुलाखून निघाल्याखेरीज सोन्याला तेज चढत नाही किंवा टाकीचे घाव सोसल्याखेरीज दगडाला देवपण येत नाही हे आपणांला माहीत नाही काय? पैलू पाडल्याशिवाय हिऱ्यालासुद्धा किंमत येत नाही. आपणांवर कोसळणारी दु:खे ही अशीच आपल्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडण्यासाठी निर्माण झाली आहेत असे आपण का समजू नये? शिवाय असे पाहा, जगात दु:खे आहेत म्हणून सुखाची किंमत आपणांस कळते ना? जगात अंधारी रात्र आहे म्हणून चंद्राला महत्त्व. त्याचप्रमाणे दु:ख आहे म्हणूनच जगात सुखाचे महत्त्व आहे असे तुम्हांला नाही वाटत? नुसते गोड जेवण जेवण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे काय? नुसत्या गोडाने तोंडाला कशी मिठी बसते हे तुम्हांला माहीत आहेच. केवळ सुखच जगात असते तर अशीच आपली स्थिती झाली नसती का? शिवाय दु:खानंतर सुख आले म्हणजे त्याची लज्जत काही न्यारीच असते असा अनुभव कुणाला नाही? परीक्षेसाठी मरमर कष्ट केल्यानंतरच निकालाच्या आनंदाची खरी गोडी आपणांस कळते. असे जर आहे तर वर्तमानकाळच्या दु:खाबद्दल आपण कुरकुर का करावी? आणि दु:ख पर्वताएवढे असे का मानावे?

**(ब) दिलेला उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.** 5

पुस्तकासारखा मित्र नाही असे म्हणतात, इतर मित्र आहेत पण ते कधी रागावतात, कधी चिडतात तर कधी चेष्टा करतात. कधी वेळेच्या अभावी उपयोगी पडत नाहीत, कधी ते आपले अंतरंग खुले करीत नाहीत. ते आपणापासून काही गोष्टी लपवून ठेवतात, परंतु पुस्तकाचे तसे नाही. त्याला जवळ करण्याचा अवकाश की ते आपले अंतरंग खुले करते. ते कधी फसवत नाही तर कधी चुकवीत नाही. नेहमी अगदी सेवेस तत्पर असते.

पुस्तकाचे पुष्कळ प्रकार असतात. काही पुस्तके अल्पायुषी तर काही दीर्घायुषी असतात. त्यांचे आयुष्य एक दिवस, सकाळी उत्साहाने व आतुरतेने आपण वाचतो पण त्याचे पारायण करतो असे कोणी म्हणेल तर ते योग्य होणार नाही. मासिकाचे आयुष्य एक महीना. परंतु काही पुस्तके सदासर्वकाळ बहुमोल असून सुप्त मनाला समाधान देतात. भगवद्‌गीता, कुराण, बायबल, वेद वगैरे ह्या प्रतिचे ग्रंथ आहेत.

**प्रश्न :-**

(1) पुस्तकासारखा मित्र नाही असे का म्हणतात?

(2) पुस्तकाचे कोणते प्रकार सांगितले आहेत?

(3) कोणते ग्रंथ मनाला समाधान देतात?

(4) या उताऱ्यातून काय प्रतीत होते?

(5) उताऱ्यास योग्य शीर्षक सुचवा.

**(क) खालील दोहोंपैकी एका विषयावर झालेल्या गटचर्चेचा संवादात्मक मजकूर सुमारे शंभर शब्दांत लिहा.** 5

(i) दुष्काळग्रस्तांसाठी मदत.

(ii) गावातील पाणी टंचाई.

5. **(अ) दिलेल्या दोन इंग्रजी उताऱ्यांपैकी एकाचे सरळ, सोप्या मराठीत भाषांतर करा.** 5

(i) Freedom is the greatest gift. God can give a nation but freedom is a strange gift. If we do not wish to lose freedom, we should show our love for it. This love we must show both in words and deeds. It is not enough to say, I am an Indian and I am proud of it, we must ask our selves, "is our mother land proud of us ? Love is shown in sacrifice, are we ready to die for our country ?"

(ii) Character is destiny, character is that on which the destiny of a nation is built. One can not have a great Nation with men off small character. But whether, in public life or student life, we can not reach great heights if we are lacking in character. We can not climb the mountain when the ground at our feet is crumbling.

**(ब) खाली दिलेल्या उताऱ्याचा आशय सरळ, सोप्या मराठी भाषेत 100 शब्दांत लिहा.** 5

बाबा पडले जमीनदोस्त. ते म्हणाले, 'मातीशी नाते लावणारा तांदळाचा एवढासा दाणा! तो किती महान! धान खडीत तो चुपचाप पहुडलेला असतो त्याच्या छातीवर हा एवढा मातीचा ढेपळा असतो. पण त्या कबरीतून तो अंकुर होऊन बाहेर येतो कसा? शेकडो दाण्यांच्या ओंब्यांना सोबत घेऊन. ही मातीची किमया! बाबा आणि माती. एकवेळ माता त्यांना आठवणार नाही, पण मातीचा विसर क्षणभरही नाही. "अहो, माती एवढे समर्थ माध्यम मला एकातरी प्रयोग शाळेत दाखवू शकाल काय? येथे तऱ्हेतऱ्हेच्या बिया टाका. एकाच ठिकाणी तुम्हांला तिखट मिरची, आंबट लिंबू, गोड पेरु सारी विविध झाडे उगवलेली दिसतील." बाबांचे मातीपुराण संपता संपणार नाही. मी आभाळतली सुखं भोगण्याची इच्छा केली, तरी पाय मात्र मातीलाच टेकीन हे त्यांचे तत्वज्ञान.

मातीची ही महती सांगण्यासाठी बाबांजवळ भरपूर पुरावा आहे. एरवी ज्यांनी जगाच्या दयेला पात्र व्हायचे व हाती भिक्षापात्र घेऊन आपले व्याधीची किळसवाणी दिखावट करीत लोकांपुढे हात पसरायचे, तेच महारोगी बाबांनी इथल्या जमीनीचे दोस्त केले. अपंगाच्या हातून त्यांनी घडविलेले महान प्रयोग! अंगठाबहादूर निरक्षरांकडून शिवाजी सारखे अवतार राज्ये चालवितात, तेही कौतुक इथे लहानच; कारण इथे हे जे फुलले आहे, ते बिनअंगठ्याच्या लोकांकडून. कोणाला नाकच नाही, कोणाचा डोळाच उंदराने नेला होता, हातापायाची बोटे गळून पडली आहेत, अशा मंडळींची फौज घेऊन हे गृहस्थ एक दिवस ह्या रानात आले. आजूबाजूला भयानक जंगल, तेथे अपंग शाहीचा राज्याभिषेक झाला.

**(ब) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणतेही दोन )** 1

(1) तोंडचे पाणी पळणे (2) हात दाखविणे (3) कंठ दाटून येणे.

**(क) खाली दिलेल्या म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणत्याही चार )** 2

(1) अति तिथे माती

(2) काखेत कळसा गावाला वळसा

(3) थेंबे थेंबे तळे साचे

(4) गोगल गाय पोटात पाय

(5) आपलेच दात आपलेच ओठ

(6) आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन!

**(ड) खाली दिलेल्या इंग्रजी परिभाषिक शब्दांना पर्यायी मराठी शब्द द्या.** 2

(1) Freedom

(2) Citizens

(3) Progressive

(4) Mountain

- o O o -